# प्रबोधन
## गोरेगाव

## ३३ वा वार्षिक अहवाल
## २००४ - २००५



जनसेवेत रुजू झालेला **ओझोन** जलतरण तलाव

# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४.
दूरध्वनी क्र. २८७३ ४८६९/२८७२ ६२७८.

www.prabodhan.org

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदवलेली संस्था (Regn.No.Mum.46/72 GB BSD)
मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदवलेली संस्था (Regn.No.F 2502 Mum.)
आयकर कलम ८०-ग खाली देणग्या करमुक्त

## पदाधिकारी व कार्यकारी मंडळ
२००४-२००५

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. मनोहर अद्वानकर, एम.एस.सी, पीएच.डी. |
| उपाध्यक्ष | : | अॅड्. विकास रेळे, बी.ए., एल.एल.बी. |
| | | श्री. सुरेश चव्हाण, बी.ए. |

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. मिलिंद डुंबरे, बी.कॉम. |
| प्रमुख कार्यवाह | : | श्री. शशांक कामत, बी.कॉम. |
| सहकार्यवाह | : | श्री. सुनिल कविश्वर |
| | | श्री. भूषण काळे |
| खजिनदार | : | श्री. नितीन शिंदे, बी.ए., डी.जे. |

## सभासद

श्री. चंद्रकांत देऊलकर
श्री. श्रीनिवास शिरसेकर, जी.डी.आर्टस्
श्री. प्रसाद भायदे
श्री. रमेश इस्वलकर
श्री. अनिल देसाई
श्री. विनोद निंबाळकर
श्री. गोविंद येतयेकर, बी.कॉम.
श्री. अरविंद सावंत
श्री. प्रफुल्ल घामणकर

अंतर्गत हिशेबतपासनीस
श्री. विवेक जोशी, बी.कॉम., एफ.सी.ए.

सनदी लेखापाल
श्री. जयंत आपटे, बी.कॉम., एफ.सी.ए.

# प्रबोधन गोरेगाव

## ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २१ डिसेंबर, २००५ रोजी रात्रौ. ८.०० वा. प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक
२. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजुरी देणे.
३. २००४-२००५ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद हिशेबतपासनीसांच्या अहवालासह वाचून मंजूर करणे.
४. नवीन वर्षाकरिता २००५-२००६ घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा), उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा).
५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेबतपासनीस व सरकारमान्य हिशेबतपासनीस यांची नेमणूक करणे.
६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून,

**मिलिंद डुंबरे**
कार्याध्यक्ष

दि. ६ डिसेंबर २००५ **शशांक कामत**
गोरेगाव, मुंबई. प्रमुख कार्यवाह

१. संस्थेचा जमाखर्च प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४ येथील संस्थेच्या कार्यालयात दि. १३ ते १५ डिसेंबर, २००५ पर्यंत संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. कोणत्याही सभासदास त्याबाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दि. १७ डिसेंबर २००५ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.
२. गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
३. निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. १७ डिसेंबर २००५ पर्यंत संस्था कार्यालयात संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नुमना सोबत दिला आहे.

# प्रबोधन गोरेगाव

## कार्यकारिणीवरील सदस्य निवडणुकीची सूचना

१. निवडणुकीसाठी उभा राहाणारा उमेदवार, सूचक व अनुमोदक घटनेनुसार पात्र असले पाहिजेत.

२. खालील विहीत अर्जाच्या नमुन्यानुसार लेखी अर्ज दि. १७ डिसेंबर २००५, पूर्वी कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.

३. निवडून द्यावयाच्या जागांइतके किंवा कमी उमेदवार असतील तर त्यांची निवड बिनविरोध झाल्याचे जाहीर करण्यात येईल व उरलेल्या जागांसाठी सभेस उपस्थित असलेल्या सभासदांमधून आवश्यक ठरल्यास उर्वरित जागांसाठी निवड करण्यात येईल.

४. निवृत्त होणारे सभासद निवडणुकीस उभे राहू शकतील.

५. उमेदवारास आपले नाव मागे घेण्याची अंतिम मुदत दि. २० डिसेंबर २००५, पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील.

६. उमेदवाराने निवडणुकीच्या वेळी सभेस उपस्थितीत राहाणे आवश्यक आहे.

---

## उमेदवारी अर्जाचा नमुना

(अर्ज स्वतंत्र कागदावर लिहिणे)

प्रमुख कार्यवाह
प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन गोरेगावच्या २००५-२००६ च्या अध्यक्षपदासाठी / उपाध्यक्षपदासाठी / कार्यकारिणी सदस्यत्वासाठी मी श्री./सौ./कु. ______________________ अर्ज करीत आहे.

सूचक सभासदाचे नाव श्री./सौ./कु. ______________________ स्वाक्षरी :
सभासद क्र :

वरील सूचनेस माझे अनुमोदन आहे.

अनुमोदक सभासदाचे नाव श्री./सौ./कु. ______________________ स्वाक्षरी :
सभासद क्र. :

वरील सूचनेस माझी संमती आहे.

उमेदवार सभासदाचे नाव श्री./सौ./कु. ______________________ स्वाक्षरी :

पत्ता : ______________________

______________________

सभासद क्रमांक :

# प्रबोधन गोरेगाव

## ३३ वा वार्षिक अहवाल

( १ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५ )

**सन्माननीय सभासद,**

**प्रबोधन गोरेगाव** या संस्थेच्या ३३ व्या वर्षाचा अहवाल संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. या अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यकारिणीच्या एकूण ८ सभा झाल्या. या सभांना समाधानकारक उपस्थिती होती. अहवाल वर्षअखेर प्रबोधन गोरेगावचे ७ आश्रयदाते, ४१९ आजीव सभासद तसेच प्रबोधन क्रीडाभवनाचे ४८५ दीर्घ मुदतीचे सभासद आहेत.

१९७२ रोजी क्रीडा व कलेची जोपासना, ज्ञानाचा प्रसार आणि समाजसेवा या त्रिसुत्रीचा आधार घेऊन प्रबोधन गोरेगाव संस्थेचे कार्यकर्ते कामाला लागले. केवळ निधी उभा करणे हा उद्देश न ठेवता समस्त गोरेगावकरांना आणि पश्चिम उपनगरवासीयांना लोकोपयोगी असे चांगले प्रकल्प, उपक्रम व कार्यक्रम देण्याचा संस्था सातत्याने यशस्वी प्रयत्न करीत आहे.

गेल्या ३३ वर्षात प्रबोधनने आखलेला प्रत्येक कार्यक्रम हा त्या त्या क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा ठरला. संस्थेचे काम गोरेगाव व मुंबई पुरते मर्यादित न ठेवता देशभर होण्यासाठी संस्थेने शास्त्रीय संगीतावर आधारित **'मुंबई फेस्टिव्हल'**, औषधी वनस्पतींना केंद्रबिंदू मानून आयोजित केलेले **'हर्बल वर्ल्ड'** हे प्रदर्शन या उपक्रमांचे भव्य-दिव्य व यशस्वी आयोजन केले.

संस्था महत्त्वाची मानून प्रत्येक कार्यकर्त्यांनि स्वतःला शिस्त लावून घेतली म्हणूनच प्रबोधनच्या इवल्याशा रोपट्याचा आज वटवृक्ष झाला. प्रबोधनने प्रत्येक नव्या गोष्टीचे स्वागत केले. कार्यक्रमा निमित्त संस्थेत येणाऱ्या प्रत्येक मान्यवरांचा व कलाकारांचा योग्य सन्मान केला, त्यामुळेच गेल्या ३३ वर्षात प्रबोधनला उज्ज्वल परंपरा निर्माण करता आली. गोरेगावला साहित्य संस्कृतीचे माहेरघर करण्यासाठी प्रबोधनचे कार्यकर्ते तन-मन-धन पूर्ण झटले आहेत व यापुढेही झटणार आहेत. सुसज्ज अशी प्रबोधन रक्तपेढी, ओझोन स्विमिंगपूल यासारखे अनेक उपक्रम हाती घेऊन संस्था यशस्वी वाटचाल करीत आहे.

संस्थेला आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देणारे देणगीदार आणि संस्थेस अनुदान देणाऱ्या संस्थांचा उपक्रमास लाभलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. स्थानिक लोकांचे सहकार्य, निष्ठावान व सेवाभावी कार्यकर्त्यांचे पाठबळ तसेच संस्थेच्या भरीव कामगिरीत वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन करणाऱ्या संस्थेच्या सल्लागार समिती सदस्यांचे आम्ही आभारी आहोत.

प्रबोधन गोरेगाव संस्थेच्या ३३ व्या वर्षातील कार्याचा इतिवृत्तांत, ताळेबंद व जमाखर्च पत्रके आम्ही सन्माननीय सभासदांच्या माहितीसाठी सादर करीत आहोत.

लोभ आहेच तो अधिक वृद्धींगत व्हावा, हीच नम्र विनंती.

कार्यकारी मंडळ,
**प्रबोधन गोरेगाव**

# हर्बल वर्ल्ड - २००४

जागतिक स्तरावर आयुर्वेदाला अन्यय साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. औषधी वनस्पतींची ओळख अधिक प्रमाणात होण्यासाठी तसेच भारतीय संस्कृतीच्या या अनमोल ठेवेचा प्रसार होण्यासाठी प्रबोधन गोरेगाव संस्थेने २००२ सालापासून हर्बल वर्ल्ड हे प्रदर्शन भरविण्यास सुरूवात केली. गेल्या तीनही वर्षी संस्थेला या प्रदर्शनास आयुर्वेदिक प्रेमी जनतेचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

सदर प्रदर्शनाच्या माध्यमातून संस्थेने नेहमीच आयुर्वेद व औषधी वनस्पतींची माहिती, त्यांचा उपयोग, दुर्मिळ दस्तावेज, संदर्भ ग्रंथ व इतर दालनातून या क्षेत्राशी निगडीत अशी माहिती जनतेसाठी प्रदर्शित केली.

यावर्षी हे प्रदर्शन प्रबोधन क्रीडाभवनाच्या प्रांगणात दि. १६ ते १९ डिसेंबर, २००४ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. चार दिवस चालेल्या या प्रदर्शनात १५० औषधी वनस्पतींची कुंडीतील रोपे मांडण्यात आली होती. या औषधी वनस्पतींच्या दालनात मांडलेल्या प्रत्येक औषधी वनस्पतींच्या माहितीचे फलक ही प्रदर्शित करण्यात आले होते. तसेच **सुगंधालय** या शीर्षकाखाली सुगंधी वनस्पतींचे एक विशेष दालन प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आले होते. या दालनात सुगंधी वनस्पतींची कुंडीतील रोपे, त्यांचे उपयुक्त भाग, त्यापासून निर्माण होणारी उत्पादने ठेवण्यात आली होती. त्याचबरोबर त्या क्षेत्रात काम करण्याऱ्या संस्था, व्यावसायिक व इतर संबंधित माहिती जनतेसाठी प्रदर्शित केली होती.

याच बरोबर पाच मुख्य दालनात औषधी वनस्पतीं क्षेत्राशी संबंधित माहिती, औषधे बनविण्याची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. तसेच ८० व्यावसायिक या प्रदर्शनात सहभागी झाले होते. व्यावसायिक स्टॉलधारकात भारतातील आयुर्वेदिक व वनौषधी कंपन्या व संस्था सहभागी झाल्या. यात हिमालय, डाबर, लोटस हर्बल, झंडु, आयुर्वेदिक रसशाळा, चरक, हिंदुस्थान लिवर आदींचा समावेश होता.

या प्रदर्शनाचे उद्घाटन ***डॉ. दर्शन शंकर***, अध्यक्ष - एफआरएलएसटी, बंगलोर यांच्या हस्ते झाले. यावेळी याक्षेत्रातील मान्यवर, तज्ज्ञ, शास्त्रज्ञ व वैद्य उपस्थित होते. प्रदर्शन कालावधीमध्ये प्रसिद्ध व्यावसायिक ***श्री. विठ्ठल कामत, वैद्य खडीवाले, वैद्य विक्रांत जाधव, श्री. प्रियराज*** व सुप्रसिद्ध ***वैद्य बालाजी तांबे*** अशा अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या व संस्थेने आयोजित केलेल्या प्रदर्शनाची स्तुती केली.

या प्रदर्शनाच्या निमित्त संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व मुंबई नेचर हिस्ट्री सोसायटी यांच्या उद्यानात निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या निसर्ग सहलीस ***डॉ. अल्मेडा, प्रो. लट्टू*** यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

हे प्रदर्शन यशस्वी करण्यास ***डॉ. अल्मेडा, प्रो. लट्टू, वैद्य विक्रांत जाधव, श्री. भरत सोनी*** यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# मुंबई फेस्टिव्हल - २००५

भारतीय अभिजात शास्त्रीय संगीत कला वाढविण्याचे काम महाराष्ट्राने केले. त्यात खासकरून मुंबईने मोठा वाटा उचलला. हिंवाळ्यात मुंबईत अनेक मान्यवार संस्थांतर्फे गेली अनेक वर्षे शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित केले जातात. पश्चिम उपनगरातील संगीत रसिकाची आवड लक्षात घेऊन २००० सालापासून प्रबोधन गोरेगाव संस्थेने **'मुंबई फेस्टिव्हल'** हे शीर्षक घेऊन संगीत महोत्सव आयोजित करण्यात सुरूवात केली.

प्रबोधन गोरेगाव संस्थेच्या आयोजन कौशल्यामुळे संस्थेने हाती घेतलेले प्रत्येक उपक्रम व कार्यक्रम आगळा-वेगळ्या स्वरूपात लोकांपुढे सादर करू शकलो. प्रत्येक कार्यक्रम नुसता यशस्वी न होता त्याची दखल त्या क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी घेतली. भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात एक आगळा वेगळा ठसा प्रबोधन गोरेगाव संस्थेने उमटविला.

सातत्याने पाच वर्षे होत असलेल्या या महोत्सवात भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकरांनी आपली कला या महोत्सवात रसिकांपुढे सादर केली. यंदा हा महोत्सव दि. २२ व २३ जाने. २००५ या कालावधीत सादर करण्यात आला. गेल्या वर्षीप्रमाणेच यावर्षी सुद्धा शास्त्रीय संगीतातील दिग्गज कलाकारांना एकाच व्यासपीठावर पाहण्याची व ऐकण्याची दुर्लभ संधी उपलब्ध होऊ शकली.

***पं. रोणू मुझमदार*** यांच्या सुमधुर बासरी वादनाने महोत्सवाची सुरूवात झाली. व त्याच दिवशी दुसऱ्या सत्रात ***बेगम परवीन सुलताना*** यांच्या गायनाचा आनंद उपस्थितीत रसिकांनी घेतला.

महोत्सवाच्या दुसऱ्या व शेवटच्या दिवशी पहिल्या सत्रात ***मृदुंगवादक पं. भवानी शंकर, तबलावादक सत्यजित तळवलकर, पखवाजवादक श्रीधर पार्थसारथी*** व लोकप्रिय ***ड्रमर श्री. शिवामणी*** यांनी एकत्रित कार्यक्रम सादर केला. या महोत्सवाची सांगता ***पं. भीमसेन जोशी*** यांच्या शास्त्रीय गायनाने झाली.

दोन दिवस चाललेल्या या महोत्सवात सहभागी कलाकरांनी सादर केलेल्या अवीट गोडीच्या बहारदार अदाकारीने रसिक मंत्रमुग्ध झाले. महोत्सवाचे सूत्र संचालन ***प्रा. केशव परांजपे*** यांनी केले. हा महोत्सव आयोजित करण्यास ***पं. सुरेश तळवलकर*** यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदर महोत्सव सहारा इंडिया परिवार, एम.टी.एन.एल यांनी पुरस्कृत केला होता.

## एस्.एस्.सी. व्याख्यानमाला

सृजनशील बुद्धीला अनिर्बंध संचार करावयाला शिक्षण क्षेत्रात अनंत संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना घडविण्याचे सामर्थ्य तसेच गगनाला गवसणी घालण्याचा ध्येयवाद निर्माण करण्याचीही शक्ती फक्त शिक्षकात आहे. तेही आजच्या संगणकीय युगात नेमक्या वेळात, नेमक्या पद्धतीने, नेमके लिहीले तरच विद्यार्थी शालान्त परीक्षेच्या गुणस्पर्धेत यशस्वी होण्यास मदत कशी होईल, हे दोन ते तीन तासात वर्षभराचा अभ्यास शिकविणे हेही शिक्षकच सांगू शकतो.

व्याख्यानमालेचे मार्गदर्शक शिक्षक प्रबोधन संस्थेच्या प्रेमापोटी मुलांना मार्गदर्शन करण्याचे काम अतिशय आवडीने व उत्साहाने करतात. सदर व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठी ***श्री. एकनाथ कुंभार*** यांचे मोलाचे सहकार्य गेली अनेक वर्षे लाभत आहे.

व्याख्यानमालेचे हे ३३ वे वर्ष असून ही व्याख्यानमाला दि. २७ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २००५ या कालावधीत प्रबोधन जॉर्गस पार्क येथे आयोजित करण्यात आली.

## प्रबोधन बालवाडी

समाजाच्या अविकसित घटकांना उपयुक्त ठरणारे उपक्रम प्रबोधन यथाशक्ति आयोजित करीत असते. त्यापैकी एक उपक्रम म्हणजे प्रबोधन संस्थेतर्फे माफक शुल्कात जवाहर नगर, गोरेगाव (प.) व कोयना वसाहत, गोरेगाव (पू.) येथील झोपडपट्टीत बालवाड्या चालविण्यात येतात. या बालवाडीत जवळपास १०० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरूपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. ***सौ. शालिनी वारीसे*** यांचे या कार्यात मोलाचे सहकार्य लाभत आहे. या उपक्रमासाठी गेली अनेक वर्ष ***सारस्वत बँकेचे*** आर्थिक सहकार्य मिळत आहे. या मोलाच्या सहकार्याबद्दल संस्था बँकेची ऋणी आहे.

## प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन

प्रबोधन गोरेगाव संस्थेने यंदाही प्रबोधन क्रीडाभवनात हे दोन्ही महत्त्वाचे **राष्ट्रीय सण** साजरे केले. सालाबाद प्रमाणे प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी सेंट जॉन शाळेच्या मुलांनी विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर केले.

# प्रबोधन आंतरशालेय क्रीडामहोत्सव

पश्चिम उपनगरातील शालेय क्रीडा जीवनातील महत्त्वाचा असा प्रबोधन क्रीडामहोत्सव ज्याची शालेय खेळाडू डिसेंबर महिना जसजसा जवळ येत जातो तेव्हा आतुरतेने वाट पाहतात. असा हा क्रीडामहोत्सव दि. ८ ते १२ डिसेंबर, २००४ या दरम्यान प्रबोधन क्रीडाभवन येथे आयोजित करण्यात आला. यात १३० शाळांतील ५००० विद्यार्थी सहभागी झाले होते.

२७ व्या प्रबोधन आंतर-शालेय क्रीडामहोत्सवाचा उद्घाटन सोहळा दि. ८ डिसेंबर, २००४ रोजी सकाळी ८.०० वाजता पार पाडला. याप्रसंगी सहाय्यक पालिका आयुक्त, पी/दक्षिण, मुंबई महानगरपालिका ***श्री. सुनिल धामणे*** हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितीत होते. त्यांना संचलन स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकांनी मानवंदना दिली. याप्रसंगी प्रबोधन संस्थेच्या प्रेमापोटी संस्थेचे हितचिंतक व अनेक मान्यवर उपस्थितीत होते. ***श्री. सुनिल धामणे*** यांनी उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात संस्था अनेक क्षेत्रात करीत असलेल्या कार्याबद्दल खास करून क्रीडाक्षेत्रासाठी करीत असलेल्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले.

क्रीडामहोत्सवाच्या समारोपापूर्वी झालेली लोकनृत्य स्पर्धा विशेष बहारदार झाली. सुमारे ३००० प्रेक्षकांच्या साक्षीने झालेल्या यास्पर्धेत विविध प्रकारची लोकनृत्ये शालेय विद्यार्थ्यांनी अत्यंत बहारदारपणे सादर केली.

सदर क्रीडामहोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ रविवार दि. १२ डिसेंबर, २००४ रोजी प्रबोधनचे संस्थापक, शिवसेना नेते व गोरेगावचे आमदार ***मा. श्री. सुभाष देसाई*** यांच्या हस्ते अत्यंत उत्साही व शिस्तबद्ध वातावरणात पार पाडला. यावेळी विजेत्या संघांना फिरते चषक व कायम स्वरूपी स्मृतिचिन्ह तसेच प्रशिस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. क्रीडामहोत्सवातील सर्वोकृष्ट संघासाठी असणारा कै. वासुदेव कृष्णाजी सैतवडेकर, फिरता प्रबोधन चषक गोरेगावच्या अ.भि.गोरेगावकर इंग्लिश हायस्कूलने सातत्याने तीन वर्षे फटकाविला.

आयडियल क्लासेस, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, ग्रेटर बँक, देना बँक, कोको कोला, सारस्वत बँक यांनी सदर क्रीडामहोत्सव पुरस्कृत केला. या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे.

(सविस्तर निकाल परिशिष्ट अ मध्ये पाहवा)

# उन्हाळी प्रशिक्षण शिबिर

प्रबोधन क्रीडाभवनच्या सर्व सुविधा १९९२ पासून सुरू झाल्या पासून मुंबईतील क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ प्रशिक्षक नियमित वर्गास प्रशिक्षण देऊ लागले. नियमित प्रशिक्षण वर्गाला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन तसेच सुसज्ज व समतोल अशा क्रीडागणाचा व क्रीडाभवनातील सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करण्याच्या विचाराने संस्थेने उन्हाळी सुट्टींमध्ये वेगवेगळ्या कला व क्रीडा प्रकाराची शिबिरे भरविण्यास सुरूवात केली.

यंदाच्या १३ व्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिरात क्रिकेट, मल्लखांब, कराटे, ॲथलेटिक्स, चित्रकला अशा विविध कला, क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. यावर्षी हे शिबिर दि. १५ एप्रिल ते ३० मे, २००४ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

गेल्या तीन वर्षापासून उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा एक भाग म्हणून ८ ते १४ वयोगटातील मुलां-मुलींसाठी विनामूल्य बाल-योग प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी १३० विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले. त्यांना योग शिक्षिका ***श्रीमती निलीमा रेडकर*** व ***श्रीमती अंजली बुराडे*** यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभले.

शिबिरातील सर्व कला, क्रीडा प्रकारात एकूण १३०० विद्यार्थी सहभागी झाले होते. क्रिकेट प्रशिक्षणाचे उद्घाटन माजी क्रिकेटपटू व मुंबई क्रिकेट संघटनेचे उपखजिनदार श्री. रवि सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व सहभागी शिबिरातील प्रशिक्षणार्थीना संस्थेतर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली. शिबिराच्या समारोपाच्या दिवशी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची प्रात्यक्षिके उपस्थितांना करून दाखविली. समारोप सोहळ्यात प्रबोधन संस्थेच्या मल्लखांब, खो-खो व ॲथलेटिक्स या क्षेत्रातील वर्षभरात चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना कै. भाऊ वराडकर स्मरणार्थ असलेल्या पारितोषिकाचे वितरण सिनियर क्रिकेटर्स सी.सी. संस्थेच्या प्रतिनिधींच्या हस्ते करण्यात आले.

## प्रोजेक्ट - २०००

**प्रोजेक्ट २०००** या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत एकूण ५ खेळाडूंना ***श्री. रवी बागडी*** यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देण्यात येते. या सर्व खेळाडूंना संस्थेतर्फे अल्पोपहार, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, खेळासाठी लागणारे साहित्य, सरावासाठी व स्पर्धेसाठी होणारा प्रवास खर्च या सर्व सोयी संस्थेतर्फे देण्यात येतात. या प्रकल्पांतर्गातील खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला व आपल्या खेळाची चमक दाखविली.

दिपाली इंगळे -

- गेल्या वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये ५ सुवर्ण, १० रौप्य व १ कांस्य पदक अशी एकूण १६ पदके पटाकाविली.

मेलिथा डिसोझा -

- गेल्या वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये ४ सुवर्ण, ४ रौप्य व ४ कांस्य अशी एकूण १२ पदके पटकाविली.
- सांगली येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत पहिला क्रमांक पटाकावला.

चारूदत्त जांभेकर

- गेल्या वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये ११ सुवर्ण, ५ रौप्य, ३ कांस्य अशी एकूण १९ पदके पटाकाविली.
- गोवा येथे झालेल्या इन्व्हिटेशन नॅशनल स्पर्धेत ८०० मीटर आणि ४ X ४०० रिले मध्ये सुवर्ण पदक पटकाविले.

## ॲथलेटिक्स

'मुंबई उपनगर ॲथलेटिक्स संघटने'शी संलग्नता स्विकारून संस्थेने क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून **'ॲथलेटिक्स'** चे प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. ॲथलेटिक्स या क्रीडाप्रकारात प्रबोधन क्रीडाभवन, गोरेगाव तसेच पश्चिम उपनगरातील एकूण २० ते ३० खेळाडू ***श्री. रवी बागडी*** यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतात. संस्थेच्या खेळाडूंनी गेल्या वर्षभरात झालेल्या जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होताना उल्लेखनीय कामगिरी केली.

## कराटे

प्रबोधन क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून गोरेगाव परिसरातील मुलांना संरक्षण व चपळता यासाठी उपयुक्त अशा क्रीडाप्रकाराचा लाभ घेता यावा, यासाठी संस्थेने 'जपान कराटे असोसिएन'शी संलग्नता व सहकार्याने कराटेचे प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. ***श्री. सीताराम चव्हाण*** व ***श्री. विशाल सुर्वे*** या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार होत असलेल्या कराटेपटूंनी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करताना अनेक पारितोषिकेही जिंकली आहेत.

प्रबोधन संस्थेचे खेळाडू ***कु. साहिल देसाई*** याने भारतीय कराटे संघाचे प्रतिनिधित्व करताना आकीता, जपान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत याने कांस्य पदक पटकाविले. तसेच टोकीयो येथे झालेल्या जागतिक वर्ल्ड कप स्पर्धेमध्ये ***कु. साहिल देसाई*** याने पाचवा क्रमांक आणि ***कु. कौस्तुभ भोसले*** याने सातवा क्रमांक पटाकाविला.

जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेत प्रतिनिधित्व करताना प्रबोधनच्या खेळाडूंनी एकूण ६२ पदके पटाकाविली. प्रबोधनचे प्रशिक्षक ***श्री. सीताराम चव्हाण*** हे आंतरराष्ट्रीय ४ थी डीग्री ब्लॅक बेल्ट परीक्षा पास झाले.

## टेबल टेनिस

प्रबोधन क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून सुरू असलेल्या **टेबल टेनिस** प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षक ***श्री. प्रकाश केळकर*** यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज साधारणत: २० विद्यार्थी प्रशिक्षण घेतात. प्रबोधन येथे प्रशिक्षण घेत असलेल्या ***जितेश पवार*** व ***मोहित राठोड*** या दोन्ही खेळाडूंनी आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

## खो-खो

**मुंबई उपनगर जिल्हा खो-खो संघटनेच्या** सहकार्याने संस्था **खो-खो** ह्या भारतीय खेळाच्या प्रसारासाठी गेली अनेक वर्षे कार्यरत आहे. भारतीय खेळांच्या प्रसारासाठी संस्था सदैव अग्रेसर राहिली आहे.

प्रबोधनच्या ***गणेश सावंत, तुषार मोरे, सत्यम चाळके, अभिजित करंजकर*** व ***पल्लवी वेंगुर्लेकर*** यांनी विविध वयोगटात राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले. तसेच प्रबोधनच्या ९ खेळांडूची मुंबई उपनगर संघात निवड झाली.

## क्रिकेट

**क्रिकेटचे** प्रशिक्षण वर्षभर खेळाडूंना दिले जाते. या प्रशिक्षणाचा लाभ गोरेगाव तसेच पश्चिम उपनगरातील खेळाडू घेतात. दर वर्षी या खेळास वाढता प्रतिसाद लाभत आहे. सकाळ व दुपार या दोन वेळात प्रशिक्षण दिले जाते.

## मल्लखांब / जिमनॅस्टिक्स

शरीराच्या सर्व अवयवांना कमीत कमी वेळात संपूर्ण व्यायाम देणारा **मल्लखांब/जिमनॅस्टिक्स** हा क्रीडाप्रकार आहे. धैर्य, ताकद, लवचिकता, कस, प्रसरणशिलता, वेग, दमछाक, सांघिक खेळांमधील संघभावना व परस्परानुभव या सर्व प्रकारच्या खेळांत आवश्यक असलेल्या कुवतीमध्ये मल्लखांबच्या नियमित सरावाने लक्षणीय वाढ होते. **मदर डिसिप्लिन** पायाभूत खेळ असे ही यास संबोधले जाते.

या खेळाच्या विकासासाठी व प्रसारासाठी संस्था गेली १३ वर्षे कार्यरत आहे. क्रीडाभवनातील यशस्वी मल्लखांब खेळाडूंच्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा खालीलप्रमाणे :-

**मंगेश वायकूळ :-**

- २४ व्या महाराष्ट्र राज्य मल्लखांब स्पर्धेत मुंबई उपनगराचे प्रतिनिधित्व करताना मल्लखांब या क्रीडाप्रकारात २ सुवर्ण, २ रौप्य पदकांचा मानकरी.
- २२ व्या राष्ट्रीय मल्लखांब अजिंक्य स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे पाचव्यांदा प्रतिनिधित्व करताना उल्लेखनीय कामगिरी केली.
- महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराचा मानकरी.

मुंबई उपनगरात व राज्यात झालेल्या अनेक अजिंक्य स्पर्धेत नेहा भावे, सविता ठाकूर देसाई, रिना स्वामी, सौरभ साईगणेश व इतर खेळाडूंनी प्रबोधन संस्थेचे यशस्वी प्रतिनिधित्व केले.

## प्रबोधन गोरेगाव संस्था खालील संस्थेशी संलग्न आहे.

- मुंबई उपनगर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना
- मुंबई उपनगर कबड्डी संघटना
- मुंबई उपनगर खो-खो संघटना
- मुंबई जिल्हा मल्लखांब संघटना
- मुंबई क्रिकेट संघटना
- मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक संघटना
- मुंबई जिल्हा टेबल टेनिस संघटना
- जपान कराटे संघटना (भारत)
- महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना
- नालंदा नृत्य संशोधन केंद्र

# प्रबोधन व्यासपीठ

**प्रबोधन व्यासपीठ** या उपक्रमा अंतर्गत गेल्या पाच वर्षात वेगवेगळ्या विषयांवर व्याख्याने आयोजित करताना संस्थेने सामाजिक कार्यातील आपले कर्तव्य पार पाडले, असे आम्हास वाटते. यावर्षी सुद्धा विविध क्षेत्रातील नामवंत, तज्ज्ञ मंडळींनी आपले विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमांना रसिक श्रोत्यांची उपस्थिती नेहमीच उत्तम राहिली आहे. व्याख्याते व विषय यांची निवड करणे, तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लेखक व पत्रकार ***श्री. शशी भालेकर*** यांचे सातत्याने मौलिक सहकार्य लाभले आहे.

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| १७ एप्रिल ०४ | डॉ. बाबुराव पालव | मराठी तरूणांना २१ व्या शतकातील संधी |
| २२ मे ०४ | डॉ. चारूशीला ओक<br>प्रसिद्ध लेखिका व नाट्य समीक्षिका | मराठी नाटकांनी समाजाला काय दिले? |
| १२ जून ०४ | डॉ. अरविंद गोडबोले<br>प्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ | मधुमेह, व्याधी आणि निवारण |
| २४ जुलै ०४ | श्री. दिलीप हेर्लेकर<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>मराठी विज्ञान परिषद | शहरी शेती |
| २१ ऑगस्ट ०४ | श्री. दा. कृ. सोमण<br>सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ | आकाशातील आश्चर्ये |
| ११ सप्टें. ०४ | क्रांतीगीता महाबळ<br>सुप्रसिद्ध व्याख्याती | स्वातंत्र्यवीर सावरकर - एक द्रष्टे व्यक्तिमत्व |
| ३० ऑक्टो. ०४ | श्री. विद्याधर घैसास<br>सुप्रसिद्ध ज्योतिषी | ज्योतिषशास्त्र - शंका निरसन |
| २० नोव्हें.०४ | ॲड्. अरविंद वझे<br>सुप्रसिद्ध वास्तुशास्त्र तज्ज्ञ | वास्तुशास्त्राची उपयुक्तता |
| १५ जाने. ०५ | ॲड्. किशोर जावळे | सुखी माणसाचा सदरा |
| १९ फेब्रु. ०५ | श्री. द्वारकानाथ संझगिरी<br>ज्येष्ठ क्रीडा लेखक | मी आणि माझी पत्रकारिता |
| १९ मार्च ०५ | प्रा. रमेश खटावकर | विद्यार्थी, पालक आणि संस्कार |

## ऋणनिर्देश

संस्थेच्या गत वर्षाच्या वाटचालीत अनेक मान्यवर व्यक्ति, संस्था, पत्रकार, क्रीडासमीक्षक त्याचप्रमाणे संस्थेच्या सभासदांचे व अनेक कार्यकर्त्यांचे सतत सक्रीय व आर्थिक पाठबळ लाभले. त्याचप्रमाणे त्यांचा संस्थेवरील लोभ सतत वृद्धिंगतच होत गेला, त्यांच्या सहकार्यामुळेच आज संस्थेने यशस्वीरित्या विविध उपक्रमांमध्ये वाटचाल केली. सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या संस्थेच्या सेवक वर्गाचेही आजवरच्या सक्रीय वाटचालीत महत्त्वाचे योगदान आहे.

संस्थेस सतत आर्थिक पाठबळ देणारे देणगीदार, दानशूर व्यक्ती व संस्था त्याचप्रमाणे गोरेगावचे आमदार, नगरसेवक या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे. त्या सर्वांबरोबरचे ऋणानुबंध व प्रेम सतत वृद्धिंगतच होत राहील, याचा आम्हास मनापासून विश्वास वाटतो.

कार्यकारी मंडळ
**प्रबोधन गोरेगाव**

## संस्थेचे आगामी कार्यक्रम

| कार्यक्रम | स्थळ | कालावधी |
|---|---|---|
| हर्बल वर्ल्ड - २००५ | मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय<br>पश्चिम द्रुतगती महामार्ग,<br>महानंदा डेअरी जवळ,<br>गोरेगाव (पूर्व), मुंबई. | २२ ते २५ डिसें.०५ |
| मुंबई फेस्टिव्हल - २००६ | प्रबोधन क्रीडाभवन<br>गोरेगाव (प.), मुंबई. | २६ ते २८ जाने.०६ |

# २७ व्या क्रीडामहोत्सवाचा निकाल (परिशिष्ट - अ)

**प्रबोधन मानचिन्ह (सर्वोत्कृष्ट संघ) :**

मानचिन्ह पुरस्कर्ते - श्री. सुरेश वासुदेव सैतवडेकर

कै. वासुदेव कृष्णाजी सैतवडेकर प्रबोधन स्मृतिचिन्ह,

शाळा : अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव.

**ॲथलेटिक्स स्पर्धा विजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. विनोद निंबाळकर

कै. शशिकला सखाराम निंबाळकर स्मृतिप्रीत्यर्थ

शाळा : चिल्ड्रन ॲकॅडमी, शीतल नगर, कांदिवली.

**ॲथलेटिक्स स्पर्धा उपविजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.एस.एन.बाळकृष्ण

कै.एस.एन.सुब्रमणियन् स्मृतिप्रीत्यर्थ

शाळा : सेंट जॉन्स दी इवनगलीस्ट हायस्कुल, अंधेरी (पूर्व).

**कबड्डी मुले विजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश टिंबर मार्ट

कै. आसाराम गायकवाड स्मृतिप्रीत्यर्थ

शाळा : साने गुरूजी विद्यामंदिर, सांताक्रुझ.

**कबड्डी मुले उपविजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश एक्सपोर्ट, गोरेगाव.

शाळा : श्रमिक विद्यालय, जोगेश्वरी.

**कबड्डी मुली विजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स जे.बी.सावंत इंजिनिअरिंग प्रा.लि.

शाळा : नंदादीप विद्यालय, गोरेगाव.

**कबड्डी मुली उपविजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश प्लास्टिक वर्क्स

शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, बांद्रा.

**टेनिस स्पर्धा विजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.व सौ. रामाराव त्रिशांक रामाराव स्मृतिप्रीत्यर्थ

शाळा : १) कनोसा हायस्कूल, अंधेरी (पू).

२) राजा राणी मल्होत्रा विद्यालय, ओशिवरा.

**टेनिस स्पर्धा उपविजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. व सौ. रामाराव त्रिशांक रामाराव स्मृतिप्रीत्यर्थ

शाळा : डॉ. एस. राधाकृष्णनन विद्यालय, मालाड (प.)

**खो-खो मुले विजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : आर.एस.जंगम

शाळा : अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव.

**खो-खो मुले उपविजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : तुलसीदास खिमजी स्मृतिप्रीत्यर्थ

शाळा : सुविद्यालय शाळा, बोरिवली.

**खो-खो मुली विजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.एन.बी.पाटील, मंदार पाटील स्मृतिप्रीत्यर्थ

शाळा : परांजपे विद्यालय, अंधेरी.

**खो-खो मुली उपविजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : सौ. आशा प्रभाकर ठाकूर

शाळा : अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव.

**संचलन स्पर्धा विजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : कै. एन.बी.पाटील

कै. बाळकृष्ण पाटील स्मृतिप्रीत्यर्थ

शाळा : सेंट ॲनिक्स हायस्कूल, बोरिवली.

**संचलन स्पर्धा उपविजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गोरेगाव स्पोर्टस् क्लब

शाळा : मेरी इमॅक्यूलेट गर्ल्स हायस्कूल, बोरिवली.

**लोकनृत्य स्पर्धा विजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स हॉटेल प्रकाश, गोरेगाव

शाळा: चिल्ड्रन्स ॲकॅडमी, मालाड (पू).

**लोकनृत्य स्पर्धा उपविजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आशीर्वाद स्टोर्स, गोरेगाव

शाळा : १) ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल, कांदिवली

२) के.पी.एस. मेमोरियल स्कूल, अंधेरी.

**मल्लखांब स्पर्धा विजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. विनोद निंबाळकर

कै. सखाराम निंबाळकर स्मृतिप्रीत्यर्थ,

शाळा : संस्कारधाम विद्यालय (कर्णबधिर), गोरेगाव (प.).

**मल्लखांब स्पर्धा उपविजेता संघ :**

मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. नितीन शिंदे,

कै. डॉ. अनंतराव शिंदे स्मृतिप्रीत्यर्थ

शाळा : बालविकास विद्यामंदिर, जोगेश्वरी.

---

**उत्कृष्ट ॲथलेटिक्स (मुलगी)**

मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आयडियल क्लासेस प्रा. लि.

पुजा मेंडन, शाळा : सेंट जॉन्स हायस्कूल, गोरेगाव.

**उत्कृष्ट ॲथलेटिक्स (मुलगा)**

मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आयडियल क्लासेस प्रा.लि.

विनित धवन, शाळा : लिलावती पोदार हायस्कूल, सांताक्रुझ.

# प्रबोधनकार ठाकरे वाचनालय

(२००४ - २००५)

## एकूण पुस्तके - ७०४५

| | | | |
|---|---|---|---|
| मराठी | - ५२४२ | इंग्रजी | - ८९१ |
| हिंदी | - ३३२ | संदर्भ ग्रंथ | - १८२ |

एकूण ग्रंथ - ६६४७

| मासिके - | पाक्षिके |
|---|---|
| इंग्रजी - सोसायटी, सॅवि, स्टारडस्ट, फिल्मफेअर, न्यु वुमन, हेल्थ<br>मराठी - चारचौघी, गृहशोभिका, ललित, अनुभव, माहेर, स्त्री, किर्लोस्कर, मैत्रिण, मिळून साऱ्याजणी, भटकंती, गृहलक्ष्मी, मानिनी, प्रपंच,<br>हिंदी - गृहशोभा, मेरी सहेली, गृहलक्ष्मी, वनिता, नवनीत. | इंग्रजी - वुमन्स ईरा, फेमिना<br>मराठी - जनप्रवाह, श्री तशी सौ<br>हिंदी - सरिता |
| एकूण - २४ | एकूण - ५ |
| **साप्ताहिके** | **वर्तमानपत्रे** |
| मराठी - चित्रलेखा, लोकप्रभा, साप्ताहिक सकाळ<br>इंग्रजी - आऊट लुक, द विक, इंडिया टूडे | मराठी - सामना, महाराष्ट्र टाईम्स, नवाकाळ<br>इंग्रजी - टाईम्स ऑफ इंडिया |
| एकूण - ६ | एकूण - ४ |

**बालविभाग**

| | |
|---|---|
| मराठी | - ५५१ |
| इंग्रजी | - ७०० |
| हिंदी | - १४७ |
| **एकूण पुस्तके** | - १३३७ |

**खरेदी केलेले ग्रंथ**

**भेट आलेले ग्रंथ** - १५

३१ मार्च २००४ अखेरीस एकूण सभासद - ८२८ ३१ मार्च २००५ अखेरीस एकूण सभासद - ८०१

**नवीन सभासद**

| | |
|---|---|
| पुस्तक विभाग | - ६६ |
| मासिक विभाग | - २८ |
| बालवाचनालय विभाग | - ४० |
| एकूण | १३४ |

**रद्द सभासद**

| | |
|---|---|
| पुस्तक विभाग | - १३८ |
| मासिक विभाग | - १२ |
| बालवाचनालय विभाग | - ११ |
| एकूण | १६१ |

## आवाहन

**प्रबोधन गोरेगाव** संस्थेने सुरू केलेल्या रक्तपेढीस आर्थिक सहाय्याची अत्यंत आवश्यकता आहे. आपणास नम्र विनंती आहे की, आपण संस्थेचे हितचिंतक या नात्याने या स्तुत्य उपक्रमासाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत देऊन संस्थेच्या या सेवाभावी व सामाजिक कार्यास आपलाही हातभार लावावा. रूपये २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या देणगीदारांच्या नावांचा उल्लेख प्रबोधन रक्तपेढीच्या फलकावर कायमस्वरूपी लावण्यात येईल.

**आपण दिलेली देणगी (८० ग)**
**नियमानुसार करमुक्त आहे**

## आवाहन

प्रबोधन गोरेगाव संस्थेने सुरू केलेल्या रक्तपेढीस आर्थिक सहाय्याची अत्यंत आवश्यकता आहे. आपणास नम्र विनंती आहे की, आपण संस्थेचे हितचिंतक या नात्याने या स्तुत्य उपक्रमासाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत देऊन संस्थेच्या या सेवाभावी व सामाजिक कार्यास आपलाही हातभार लावावा. रूपये २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या देणगीदारांच्या नावांचा उल्लेख प्रबोधन रक्तपेढीच्या फलकावर कायमस्वरूपी लावण्यात येईल.

**आपण दिलेली देणगी (८० ग) नियमानुसार करमुक्त आहे.**

ज्ञान-कला-सेवा यांचा त्रिवेणी संगम

# प्रबोधन
गोरेगाव

**प्रबोधन क्रीडाभवन,** प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर,
गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ दूरध्वनी : २८७३ ४८ ६९/२८७२ ६२ ७८
www.prabodhan.org

---

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेले

## प्रबोधन क्रीडाभवन

या सर्वांगसुंदर क्रीडासंकुलामध्ये क्रिकेट, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, टेबलटेनिस, योग, खो-खो, कराटे व नृत्य यांचे तज्ज्ञांकडून प्रशिक्षण उपलब्ध तसेच सुसज्ज व्यायामशाळा, हेल्थसेंटर

---

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहकार्यातून साकार झालेले

## प्रबोधन जॉगर्स पार्क

टेनिस प्रशिक्षणाची आणि सरावाची सुविधा असलेली **टेनिस ॲकॅडेमी** आणि सभोवताली सुंदर वनराई असलेला **जॉगिंग ट्रॅक**

मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्याने परिपूर्ण

## प्रबोधनकार ठाकरे वाचनालय

प्रत्येक घरासाठी, घरातील प्रत्येकासाठी उत्तमोत्तम पुस्तके आणि बाळगोपाळांसाठी ज्ञान-मनोरंजनाचा मेवा

**प्रबोधन जॉगर्स पार्क** : सिद्धार्थ नगर, रस्ता क्र. १७, गोरेगाव (प.),
मुंबई - ४०० ०६२. दूरध्वनी : २८७८ २३ २४.

---

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेली

## माँ साहेब सौ. मीनाताई ठाकरे प्रबोधन रक्तपेढी

२४ तास कार्यरत असलेल्या या रक्तपेढीत अल्प दरात रक्त व रक्तघटक उपलब्ध.

सिद्धार्थ रूग्णालय, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४. दूरध्वनी क्र. २८७२ २९ २९/७१ ७१.

---

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेला

## ओझोन जलतरण तलाव

**'ओझोन'** प्रक्रियेचा वापर केलेल्या जलतरण तलावात
तज्ज्ञांकडून पोहण्याचे प्रशिक्षण माफक दरात उपल्बध.

निरलॉन ऑलिम्पिक जलतरण तलाव, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४.
दूरध्वनी क्र. २८७२ ६२ ६२ / ५६२८३९५५